# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


**अतितात्काळ**

क्रमांकः-तंशिस/विकाना/महाडीबीटी पोर्टल/2017/2723

दिनांक 27 SEP 2017

प्रति,
सर्व प्राचार्य,
शासकीय,अनुदानित व विनाअनुदानित संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषयः- शैक्षणिक वर्ष 2017-18 करिता महाराष्ट्र शासनाच्या नव्याने सुरू करण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलवर आपल्या विभागातील सर्व लॉगीन आयडी व पासवर्ड देण्याबाबत.

संदर्भः- मा. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे का. पत्र.क्र.18/तशिसं/महाडीबीटी पोर्टल/2017/157/ दि.21/09/2017

उपरोक्त संदर्भान्वये सर्व संस्थांना कळविण्यात येते, की शैक्षणिक वर्ष 2017-18 पासुन महाराष्ट्र शासनाच्या नव्याने सुरु करण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाडीबीटी पोर्टल/MahaDBT Portal व्दारे तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई याचेमार्फत खालील योजना राबविण्यात येणार आहेत.

1.**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना**
2.**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना**
3.**उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना(वैद्यकिय अभ्यासक्रम वगळून)**

उपरोक्त तिन्ही शिष्यवृत्ती योजनांसाठी ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनांचे संकेतस्थळ www.mahadbt.gov.in व्दारे भरून घेण्याबाबत तरतुद महाराष्ट शासनाने उपलब्ध करून दिलेली आहे.

वरील योजनांचे काम सुव्यस्थित पार पाडण्याकरिता मा.संचालक तंत्रशिक्षण म.रा. मुंबई यांचेव्दारे सर्व संस्थांचे,संस्थांचे क्लार्क व प्राचार्यासाठी (**एका संस्थेसाठी महाडीबीटी पोर्टलचे दोन लॉगीन व पासवर्ड**) लॉगीन आयडी व पासवर्ड या कार्यालयास प्राप्त झाले आहे.सदर लॉगीन आयडी व पासवर्ड हे संबंधित संस्थांनी पत्र देवून संस्थेच्या संबधित कर्मचा-यास पाठवून या कार्यालयातून दि. 26/09/2017 **पासुन** 29/09/2017 पर्यंत प्राप्त करून घ्यावे. प्राधिकार पत्राशिवाय कोणत्याही संस्थेला लॉगीन आयडी व पासवर्ड दिला जाणार नाही.

**विभागीय कार्यालयातून संबधित संस्थेला दिला गेलेला पासवर्ड ताबडतोब बदलून घ्यावा.** सदर पासवर्ड न बदलता तोच ठेवल्यास याबाबतची सर्वतोपरी जबाबदारी संस्थांप्रमुख/प्राचार्यांची राहील,यांची दक्षता घेण्यात यावी. तसेच विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची छाननी, संबंधित संस्थांचे क्लार्क व प्राचार्य यांचे लॉगीन आयडी व पासवर्ड वापरून संस्थांस्तरावर mahadbt वर दिलेल्या विहीत मुदतीत करण्यास सुरूवात करण्यात यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रतः- 1. मा. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.